# राशिभविष्य-ऑगस्ट,२०१९.

**दादा दामले** (dadadamle@gmail.com)

=========================================

**(१) मेष-** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत हर्षल असल्यामुळे या राशीच्या मंडळींचा स्वभाव अद्यापही अस्थिर, चंचल, लहरीच राहिला असावा, असे वाटते. पण मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण केल्यास हाच हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होऊ शकेल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या राहूमुळे मन हरहुन्नरी, उदार झाले असल्यास हातून कर्तृत्व घडू शकेल. पण या राहूमुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. जपा. महिन्याच्या प्रथम सप्ताहात या राशीच्या मंडळींच्या कौटुंबिक सुखात विविध कारणांनी बाधा येण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्यात होणे संभवते. जपा. शिवाय रवि ग्रह प्रतिकुल असल्यामुळे या राशीच्या नोकरदार मंडळींनाही नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागण्याची शक्यता आहे. पण ज्यांच्याकडे शेतीवाडी आहे त्यांना शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे त्यापासून लाभ होणे संभवते. बुधामुळे मित्रसुख मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात स्वतः:चे व संततीपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाची आचरणविषयक समस्या, प्रिय जनांपासून होणारे दूरत्व अशापैकी कारणांनी मनाची अस्वस्थता वाढण्याची शक्यता दिसते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. अशा प्रतिकुल परिस्थितीत या राशीच्या ज्या मंडळींना एखाद्या कलेची मनापासून आवड आहे त्यांना त्या कलेच्या साधनेपासून सुखसमाधान मिळू शकेल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होईल. शनि ग्रहामुळे प्रवासयोग येणे संभवते; पण केतुमुळे ढोंगी आचरण होणेही संभवते. या राशीच्या लाभस्थानी असलेला नेपच्यून ग्रह प्रतिकुल असून त्यामुळे आर्थिक नुकसान होणे, कुमार्गी मित्रांचा त्रास सहन करावा लागणे अशापैकी घटना घडणे संभवते. त्यामुळे काही मंडळींना गहिरे नैराश्य येण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर २१ वेळा “ओम गं गणपतये नमः:” मंत्राचा जप करा. तसेच “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे पठण करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. केवळ गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने काही मनोनुकुल घटना घडतील. इतकेच. या राशीच्या व्ययस्थानी असलेला हर्षल ग्रह कौटुंबिक जीवनात अनपेक्षितपणे वाईट प्रसंग, आर्थिक चिंता निर्माण करणाची शक्यता असते. काही मंडळींना जिवावरच्या प्रसंगाशी मुकाबला करण्याची वेळ आणतो. शिवाय अकारण शत्रुत्व निर्माण करतो. त्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. वाद, गैरसमज टाळा. या राशीच्या धनस्थानी असलेला राहूही आर्थिक चिंता व कौटुंबिक सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना रवि-मंगळ-शुक्र हे तीन ग्रह या महिन्याच्या पूर्वार्धातच अनुकुल होणार असल्याने जे काय साध्य करावयाचे ते या महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करा. महिन्याच्या उत्तरार्धात विविध कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. केवळ शेती व्यवसाय असणारांना महिन्याचा उत्तरार्ध लाभदायक होईल. या राशीच्या सप्तम

स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे या राशीच्या विवाहेच्छूना विवाहयोग संभवतो. ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते दृढ होतील. तर काही मंडळींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. काही मंडळींना प्रवासयोग येईल; तर काही मंडळींना अर्थलाभ होणेही शक्य आहे. या राशीच्या अष्टम स्थानी असलेले शनि -केतु शारीरिक-मानसिक अनारोग्यकारक असून त्यांच्यामुळे काही मंडळींना मोठा आजार, काहींना त्वचा रोग, मुख-दंत रोग किंवा रक्तविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. शनीमुळे कौटुंबिक जीवनात असमाधानकारक घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे या राशीच्या स्वतंत्र व्यवसाय असणाऱ्या मंडळींच्या व्यवसायात अस्थिर परिस्थिती निर्माण होणे संभवते. हा नेपच्यून केवळ मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थ व्यापार असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. दररोज नियमितपणे स्नान झाल्यावर या राशीच्या पुरुषानी “ओम नम: शिवाय “ मंत्राचा व स्त्रियांनी “ओम शिवाय नमः:”मंत्राचा एक माळ जप करावा. तसेच “शिवलीलामृत “ स्तोत्राचे पठण करावे.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात शारीरिक-मानसिक आरोग्याची काळजी घेणे आवश्यक होईल. या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या राहूमुळे कारण असो वा नसो, अपमान सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. तसेच काही मंडळींना वातविकार त्रस्त करतील. या महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या धनस्थानी असलेले रवि -मंगळ ग्रह प्रतिकुल असून आरोग्यविघातक आहेत. त्यामुळे उष्णताविकार बळावतील व डोळे, घसा, मान, दाढ दुखणे, ताप येणे, अशापैकी आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. त्याशिवाय वाढत्या खर्चाची चिंता, वित्तहानी, अशापैकी घटना असह्य मनस्ताप देतील, असे वाटते. पण बुध -शुक्राच्या अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. काही मंडळींना बढती, काहींना पगारवाढ, क्वचित कोणास एखादे मानाचे स्थान वा उच्च पद मिळणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात काहीही कारणाने शत्रुत्व
निर्माण होणे संभवते. किंवा हितशत्रूपासून त्रास होणे संभवते. जपा. शुक्रामुळे या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनचं अधिक अर्थलाभ होईल. तसेच जन्मकुंडलीत योग असेल तर या राशीच्या काही मंडळींना भूमिलाभ, काहींना मनाचे स्थान तर काहींना प्रतिष्ठा प्राप्त होणे शक्य दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे आरोग्य सुधारेल व हा गुरु नोकरी-व्यवसायाला पूरक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेले शनि -केतू आरोग्यविघातक असून वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करतील या राशीच्या भाग्यस्थानी असलेला नेपच्यून शुभ असून अध्यात्मात रुची असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच या नेपच्यूनमुळे काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील; तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी प्राप्त होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या हर्षलमुळे सर्व काही अपेक्षेप्रमाणे घडेलच याची खात्री देता येत नाही. पण मित्रांशी वाद, भांडणे होणे मात्र संभवते. पण काही भाग्यवान मंडळींना अर्थलाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती प्राप्त होईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींना या संपूर्ण महिन्याचा संपूर्ण काळ घरीदारी शारीरिक कष्ट, दगदग व अनारोग्यकारक आणि मनस्तापदायक असल्याचाच अनुभव येईल. अहंकारी स्वभाव व स्वतः:संबंधी मोठेपणाच्या अवास्तव कल्पना कराल तर अधिकच असहय मनस्ताप सहन करावा लागेल. त्यामुळे थकावट अनुभवावी लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात उष्णताविकार बळावून मान, घसा, दाढा, डोळे यांपैकी कसले तरी अनारोग्य त्रस्त करण्याची शक्यता आहे. हृदयविकार, रक्तविकार असणारांनी मनस्थिती शांत ठेवावी व सहनशील बनून नम्रतेचे आचरण केल्यास खूपच सुखाचे होईल. त्यामुळे शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे मधून मधून ज्या मनोनुकुल घटना घडतील त्यांचा आनंद घेऊ शकाल. या राशीच्या पंचम स्थानी असलेला गुरु ग्रह अनुकुल असल्यामुळे या राशीचे विद्यार्थी शिक्षणात सहज अपेक्षित प्रगती करू शकतील. तसेच ज्यांचे प्रेमसंबंध असतील ते अधिक घट्ट होतील. ज्या गर्भवती स्त्रियांचा प्रसूतिकाळ या महिन्यात आहे त्यांना पुत्रप्राप्ती होणे संभवते. काही मंडळींना अर्थलाभ होणेही शक्य आहे. चिकित्सक बौद्धिक आणि शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना, वकिली सल्लागारी व्यवसाय असणारांना तसेच लोखंड, कोळसा व्यापार असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल , प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. केतु ग्रह गुणी जनांना आपल्या गुणांचा विकास होण्यास अनुकुल होईल. काही गुंणवंतांना प्रसिद्धी मिळणेही शक्य आहे. तसेच या केतूमुळे आरोग्य उत्तम राहू शकेल. परंतु जलभय आणि विष भय असल्याने जलप्रवास करू नका व खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच उघड्यावरचे खाद्यपदार्थ खाऊ नका. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे हितशत्रू पराभूत होतील. अन्य प्रकारच्या शत्रूंपासून रक्षण होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. पण हा राहू वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करू शकेल. जपा. आपली राशी गुरु ग्रहाची उच्च राशी असल्याने श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे”चे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. रवि, मंगळ, बुध हे प्रमुख ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. अशा प्रतिकुल काळात आपल्या अहंकारी, अधिकारशाही तसेच मानापमान फार असलेल्या स्वभावावर नियंत्रण ठेवून, मन व विचारशक्तीवर ताबा ठेवून, जिभेला लगाम घालून, सहनशील बनून नम्रतेचे आचरण करणेच सुखाचे होईल. त्यामुळे शारीरिक, मानसिक आरोग्य फारसे बिघडणार नाही व गुरु-शुक्रासारख्या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने ज्या मनोनुकुल घटना घडतील त्यांचा आनंद व सुखसमाधान अनुभवू शकाल. आर्थिक चिंता व सतत मनस्ताप देणाऱ्या व मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. हाती घेतलेल्या कामात अडथळे , अडचणी येणे, पराजय होणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळींना तर घरीदारी, सर्व ठिकाणी वाद, भांडणे होत गेल्यास असहय मनस्ताप होणे संभवते. त्यामुळेच शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकाराचे आजार होणे संभवते. मनस्तापामुळे गहिरे नैराश्य येणेही संभवते. रक्तदाब, हृदयविकार अशापैकी आजार असणारांनी तर अधिकच जपले पाहिजे. बुधामुळे आर्थिक हानी होणे, मैत्रीत वितुष्ट येणे, काहींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे कौटुंबिक सुख मिळू शकेल; पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. पण काही भाग्यवान मंडळींचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार मात्र अपेक्षेनुसार घडून येतील. या राशीच्या पंचम स्थानी

असलेल्या शनि - केतूमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना चिकाटीने अभ्यास करता आला तरच शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. पण पोटाच्या आजारामुळे मनापासून अभ्यास करणे जमेलसे दिसत नाही. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे शक्य दिसते. .या राशीच्या भाग्यस्थानी असलेला हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायी होईल. त्यामुळे काहींना दूरच्या प्रवासाची तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी प्राप्त होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या राहूमुळे या राशीच्या अधिकारी मंडळींना वाममार्ग धन मिळवण्याचा मोह होईल; पण त्यांनी कटाक्षाने तो मोह टाळावाच. " होत्याचे नव्हते होण्यास" वेळ वेळ लागणार नाही. तसेच त्यांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करू नये. हा राहू संततीबाबत चिंता निर्माण करण्याची शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना मन:शक्ती व मन:शांती देऊ शकेल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच सर्व दृष्टींनी अनुकुल व लाभदायक होईल. म्हणून त्यांनी महिन्याच्या पूर्वार्धातच जे काय साध्य करावयाचे ते साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. महिन्याचा उत्तरार्ध प्रतिकुल असल्याचाच अनुभव येणार आहे. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना महिन्याच्या पूर्वार्धात अपेक्षित सुखसमाधान लाभेल. काही मंडळींना बढती, काहींना पगारवाढ तर क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. पण मंगळ ग्रहामुळे खाजगी नोकरदार मंडळींना खूप कष्ट परिश्रम करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती करून घ्यावी लागेल. शिवाय मैत्रीत वितुष्ट येण्याची शक्यता आहे. पण काही भाग्यवान मंडळींना मौल्यवान गोष्टीचा लाभ होणेही संभवते. या राशीच्या दशम स्थानी असलेला राहू अनुकुल असून त्याच्यामुळेही नोकरदार मंडळींना काही लाभ होतीलच. महिन्याच्या उत्तरार्धात रवि - मंगळ - बुध प्रतिकुल होणार असून त्यामुळे मनाविरुद्ध घटना घडणे, मनस्थिती अस्वस्थ होणे, गहिरे नैराश्य येणे, वाद, भांडणे होणे, मानहानी होणे, आर्थिक चिंता सतावणे, त्यामुळे अनारोग्य होणे संभवते. अशा प्रतिकुल काळात शुक्र ग्रहाच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला गुरु ग्रह या राशीच्या लेखकवर्गाला अनुकुल होईल व काहींचे लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित होणेही संभवते. काही मंडळींना प्रवासाचे योग येतील. पण या गुरु ग्रहामुळे एखाद्या भावंडाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या शनि -केतु ग्रहांमुळे गृहसौख्यात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे . या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात
उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना त्रस्त करील. काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. काहींना फसवणूक झाल्याचा धक्का बसेल. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या हर्षलमुळे अपघात भय आहे. त्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. वाहन नियंत्रित वेगाने व सावधानतेनेच चालवा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा, दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(७) तुळा -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय भावनाशील झाली असण्याची शक्युता जाणवते. कसले तरी मानसिक दु:ख किंवा चिंता त्रस्त करत असावी असेही वाटते. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक,

यशदायक व लाभदायक होईल. पण हातावरचे पोट असणारांना मात्र कष्ट, परिश्रम करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती करून घ्यावी लागेल. या राशीच्या दशम स्थानी असलेले मंगळ-शुक्र ग्रह लाभस्थानी जाईपर्यंत या राशीच्या स्वतंत्र व्यवसाय असलेल्या मंडळींना व्यवसायात खळबळजनक घटना घडत असल्याचा अनुभव येईल. काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण हा मंगळ या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर या राशीच्या काही भाग्यवान मंडळींना मौल्यवान वस्तूचा लाभ होणे संभवते. पण याच मंगळ ग्रहामुळे मैत्रीत वितुष्ट येणेही संभवते. जपा. पण शुक्र ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात लाभस्थानी गेल्यावर मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. बुध ग्रह अनुकुल असल्याने काही मंडळींना धनलाभ तर काहींना मित्रलाभ होईल. त्यामुळे मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या धनस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे कुटुंबात शुभ घटना घडतील, स्वतंत्र व्यवसाय असणारांना व्यावसायिक प्रगती करणे सहज शक्य होईल. तृतीय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे काही मंडळींना अपेक्षेनुसार उत्तम नोकरी किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण या शनि ग्रहामुळे भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या हर्षलमुळे वैवाहिक जीवनातील सुखात काहीही कारणाने बाधा येणे संभवते. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी संशय, वाद अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या राहूमुळे काही मंडळींना प्रवासयोग येणे संभवते. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल व मन:शांती व मन:शक्ती प्राप्त होईल. दररोज या राशीच्या पुरुषानी
“ओम नमः: शिवाय” मंत्राचा व स्रियांनी “ओम शिवाय नमः:” मंत्राचा एक माळ जप करावा. तसेच “शिवलीलामृत” स्तोत्राचे पठण करावे.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. शनि ग्रहाच्या साडेसातीचा अखेरचा काळ आहे. शुक्रवार, दिनांक २४ जानेवारी, २०२० पासून या राशीची मंडळी शनि ग्रहाच्या साडेसातीतून मुक्त होत आहेत. म्हणून उर्वरित साडेसातीच्या काळात या राशीच्या मंडळींनी मनावर आणि विचारशक्तीवर ताबा ठेवून, सहनशील बनून नम्रतेचे
आचरण केल्यास होणारा मनस्ताप सुसह्य होईल व शारीरिक अनारोग्यही फारसे होणार नाही. शिवाय शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने ज्या मनोनुकुल घटना घडतील त्यांचा आनंद व सुख-समाधान अनुभवू शकाल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने आरोग्य फारसे बिघडणार नाही, पण बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना, शिक्षणक्षेत्रात कार्यरत असणारांना, लेखकांना काळ अनुकुल होईल व त्यांना प्रगती करणे, यश मिळविणे सहज शक्य होईल. पण या राशीच्या अन्य नोकरदार मंडळींना मात्र महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल. प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. स्वतंत्र व्यवसाय असणारांना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईल व महिन्याच्या उत्तरार्धात व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. कुटुंबस्थानी असलेले शनि व केतु प्रतिकुल असल्याने या राशीच्या मंडळींच्या कौटुंबिक जीवनात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता आहे. तसेच आर्थिक संकटे येणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे संभवते. गृहसौख्य स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे वाद, गैरसमज, अन्य घोटाळे यामुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना पूरक होईल. पण अति विचार करू नका. तसेच बुद्धीला

ताण पडेल असा सखोल विचार पण करू नका. नपेक्षा डोकेदुखी किंवा मेंदूविकार बळावण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या राहूमुळे जन्मकुंडलीत योग्य असेल तर काही मंडळींना अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होऊ शकेल व सुखसमाधान लाभेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती व मन:शक्ती प्राप्त होईल. दररोज स्नान झाल्यावर " ओम गं गणपतये नमः: " मंत्राचा एकवीस वेळा जप करा. तसेच "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्राचे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी एकदा "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. एकूण सर्वच ग्रहस्थिती प्रतिकुल असणार आहे. शिवाय शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे ही गोष्ट ध्यानात घेऊन या राशीच्या मंडळींनी मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून, सहनशील बनून नम्रतेचे आचरण करणेच सुखाचे होईल. ज्यांना अध्यात्माची मनापासून आवड आहे त्यांना मात्र गुरु-नेपच्यूनच्या अनुकुलतेने आध्यात्मिक उपासनेस काळ अनुकुल होईल व आध्यात्मिक प्रगतीसह मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. रवि-शनि - मंगळ हे वातपित्तकारक ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याने वातविकार व उष्णताविकाराचे आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या प्रथम स्थानी असणारा केतु अपघातकारक असल्याने हाडमोड होणेही संभवते. जपा. तसेच शनि ग्रहामुळे सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या व असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे मानसिक अनारोग्य होणेही संभवते. जपा. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे ही गोष्ट सतत ध्यानात घेऊन नम्रतेचे आचरण करणेच सुखाचे होईल. पण भावी अनुकुल काळात जे काय साध्य करावयाचे त्याची पूर्वतयारी करण्यास हरकत नाही. रवि - मंगळ हे उष्ण प्रकृतीचे ग्रह प्रतिकुल असल्याने शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकाराचे आजार होणे संभवते. काही मंडळींना मूळव्याधीसारखे आजार त्रस्त करतील. शिवाय या मंगळ ग्रहामुळे पाण्यापासून व विजेपासून धोका असल्याने खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका, जलप्रवास करू नका व विजेवर चालणारी उपकरणे कार्यक्षम आहेत याची खात्री करूनच त्यांचा वापर करा. रवि ग्रहामुळे नोकरीत अपेक्षाभंग होणे, अपमान होणे, हाती घेतलेल्या कामात अडथळे, अडचणी निर्माण होणे, अपयश येणे कामाचा असह्य ताण सहन करावा लागणे अशापैकी नैराश्य आणणाऱ्या घटना घडणे संभवते. जपा. या राशीच्या सप्तमस्थानी असलेल्या राहूमुळे मनात कपटी विचार येणे संभवते. वाम मार्ग धनप्राप्तीचा मोह होणे संभवते. मनावर ताबा ठेवा. नपेक्षा हा राहू होत्याचे नव्हते करू शकेल. जपा. स्वतः:च्या किंवा जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. अशा प्रतिकुल काळातही ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसा हक्काने धनलाभ होऊ शकेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे व "हनुमान- चालीसा" स्तोत्राचे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींचा शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ चालू आहे ही गोष्ट सतत ध्यानात ठेवून योग्य प्रकारे आचरण केलेत तर होणारा मनस्ताप सुसह्य होईल. या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचा स्वभाव अति लहरी होणे संभवते. त्यावर नियंत्रण राखू शकलात

तर खूपच सुखाचे होईल. व्यय स्थानी असलेला शनि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडवणारा असल्याचा अनुभव येईल. या काळात आर्थिक व्यवहार विचारपूर्वक व काही भानगड, घोटाळे, फसवणूक होणार नाही याची काळजी घेऊनच करा. अन्य प्रकारे संकट येणेही संभवते. जपा. त्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या धनस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे विविध प्रकारे आर्थिक समस्या त्रस्त व अस्वस्थ करतील. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला हर्षल कसलेही सुखसमाधान लाभू देणार नाही. सतत कुरकुर, तक्रारी करत राहाल. त्याच्यामुळे आपले कोणाशीच पटणार नाही. आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान व गृहसौख्य मिळणे अशक्य होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या राहूमुळे हितशत्रूंचा पराभव होईल. तसेच ज्यांचा अन्य जातिधर्माच्या मंडळींशी व्यावसायिक संबंध आहे अशा मंडळींना अशा संबंधामुळे आर्थिक वा अन्य प्रकारचे लाभ होतील. या राशीच्या सप्तम-अष्टम स्थानी असणारे रवि - मंगळ - बुध ग्रहही पूर्णपणे प्रतिकुल असून त्यांच्यामुळे स्वतः:चे किंवा जीवनसाथीचे अनारोग्याची चिंता त्रस्त करणें, त्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. काही मंडळींना पोटविकाराचा तर काही मंडळींना मूळव्याधीसारखा आजार त्रस्त करील; तर काही मंडळींना वाद, भांडणे यांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. अपघात झाल्यास हाडमोड होणे संभवते. पाणी व वीज यांच्यापासून धोका असल्याने खोल पाण्यात पोहू नका. जलप्रवास करू नका. विजेची उपकरणे काळजीपूर्वक व सावधानतेने हाताळा . . ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशय, वाद , मतभेद अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. इच्छा, अपेक्षा पूर्ण होणार नाहीत. बुध -शुक्र ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर पुष्कळ प्रमाणात अनुकूल होतील व त्यामुळे मानसिक सुखसमाधान लाभेल. कमी श्रमात अर्थलाभ होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. . काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेला गुरु ग्रह विविध अंगांनी अनुकुल होईल व काहींना अर्थलाभ तर काहींना वाहनसुख देईल. तसेच काही मंडळींच्या इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. विवाहेच्छूना विवाह योग येईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना नवे मित्र मिळतील. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना करा. मन:शांती व मन:शक्ती प्राप्त होईल. या राशीच्या पुरुषानी दररोज स्नान करून "ओम नम: शिवाय" मंत्राचा व स्त्रियांनी "ओम शिवाय नम::" मंत्राचा एक माळ जप करावा व "शिवलीलामृत " स्तोत्राचे तसेच "हनुमानचालिसा" स्तोत्राचे
पठण करावे.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींची मानसिक स्थिती सध्या अत्यंत कोमल झाली असण्याची शक्यता दिसते. तसे असेल तर मानसिक संवेदनाही अति जलद होत असतील; व त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तर लगेच मन उदास होऊन गहिरे नैराश्य येत असले पाहिजे. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. म्हणून त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. पण त्यासाठी शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. कारण या राशीच्या काही मंडळींना पोटविकाराचा, तर काही मंडळींना उष्णता विकाराचा आजार होणे संभवते. हृदयविकार, रक्तविकार असणारांनी मनाचा क्षोभ होणार नाही याची काळजी घ्यावी. काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास होणे संभवते. काही गुणवान व योग्यता

प्राप्त मंडळींना आपले कर्तृत्व सिद्ध करण्यास संधीच मिळणार नाही. म्हणून त्यांनी निराश होऊ नये. कारण महिन्याच्या उत्तरार्धात शुक्र ग्रह अनुकुल होईल व सर्व सुखाचेच होईल. पण मंगळ -बुध हे एकमेकांचे शत्रू ग्रह या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर पतिपत्नीत वाद, गैरसमज, अन्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडल्यास वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येऊ शकेल. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला हर्षल व दशम स्थानी असलेला गुरु हे दोन्ही ग्रह उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना अनुकुल होतील व त्यामुळे त्यांना आपल्या कार्यात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. वरिष्ठ अधिकारी त्यांच्या कर्तृत्वाचे कौतुक करतील. काही भाग्यवान मंडळींना मानसन्मान प्राप्त होईल; तर काहींना परदेशगमनाची संधी मिळू शकेल. काही मंडळींना त्यांचे आवडते कार्यक्षेत्र मिळणेही शक्य आहे. या राशीच्या लाभस्थानी असलेला शनि ग्रह सर्वसाधारण शुभ असला तरी त्याच्यामुळे विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर “शिवोपासना” व “श्रीहनुमान उपासना “ अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. या राशीच्या पुरुषानी स्नान झाल्यावर “ओम नमः:शिवाय” मंत्राचा तर स्त्रियांनी “ओम शिवाय नमः: “ मंत्राचा एक माळ जप करावा. तसेच “शिवलीलामृत” स्तोत्राचे व “श्रीहनुमानचालिसा” स्तोत्राचे पठण करावे.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींची मनस्थिती सध्या अति अस्थिर, उदास, निराश असावी, असे वाटते. तसे असेल तर विचारशक्तीवर नियंत्रण राहात नसेल व अविचाराने वाटेल तसे आचरण होत असले पाहिजे. विचार न करता समोरच्याला वाटेल तसे फटकळपणे बोलून त्याचा अपमान होत असला पाहिजे. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या राहूमुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात
बाधा निर्माण होत असेल. मनासारखे काही घडत नसेल. हाती घेतलेल्या कामात अपयश येणेही शक्य आहे. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल होणार असल्यामुळे त्या काळात जे साध्य करावयाचे त्याची पूर्वतयारी महिन्याच्या पूर्वार्धात करून ठेवा. महिन्याच्या पूर्वार्धात रवि -मंगळ -बुध संतति सुखाच्या दृष्टीने प्रतिकुल असल्यामुळे मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाची आचरणविषयक समस्या अशापैकी कारणांनी संतति सुखात बाधा येणे संभवते. त्याशिवाय स्वत:चे अनारोग्य, नोकरीत वरिष्ठांचा जाच, प्रिय जनांपासून होणारा दुरावा अशापैकी कारणांनी मनस्थिती अस्वस्थ राहण्याची शक्यता दिसते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात उष्णताविकाराचे आजार, आर्थिक नुकसान, अपप्रचाराचा त्रास अशापैकी कारणांनी मनस्ताप होणे संभवते. हृदयविकार असणारांनी मन व विचारशक्तीवर ताबा ठेवून व सहनशील बनून आचरण केल्यास सुखाचे होईल. पण नोकरी, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, वकिलीसल्लागारी व्यवसाय, औषधी संशोधन व्यवसाय असणारांना महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण शुक्रामुळे कलागुण व कर्तृत्व असूनही ते व्यक्त करणासाठी आवश्यक अशी संधीच मिळणार नाही. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला गुरु ग्रह आध्यात्मिक प्रगतीस अनुकुल होईल, सुप्त इच्छा पूर्ण करील, काही मंडळींना प्रसिद्धी तर काहींना प्रवासयोग देईल. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या केतुमुळे या राशीच्या काही युवकांना हातची नोकरी सोडून नवीन काही तरी करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तसे काही करू नये. नुकसान होईल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती व मन:शक्ती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====

: